# राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १३ व्या बैठकीचे इतिवृत्त

दि. २४/०३/२०२४

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २६.११. २०२४ रोजीच्या १२ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची बैठक दि. २६/११/२०२४ रोजीच्या मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना वितरीत करण्यात आले होते. बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या पुर्तते संबंधी तपशील "परिशिष्ट -अ" नुसार सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २६.११.२०२४ रोजीच्या १२ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. तसेच प्रपत्र-अ मधील विषय क्रमांक-७ नुसार श्री.बाळासाहेब राजाराम शिंदे, पाणलोट विकास नियंत्रक (विविक्षीत कामाकरिता) यांचा दिनांक- ०३/१२/२०२४ पासून राजीनामा मंजूर करण्यात आला. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| २. | कार्यालय भाड्याने घेण्यास मान्यता मिळणेबाबत व आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयासाठी प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक १.० ची यापूर्वी वापरात असलेली मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, पुणे येथील जागा सध्या या कार्यालयासाठी वापरात आहे. सदरची जागा ही सध्या कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना अपुरी पडत असून या कार्यालयात अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच या कार्यालयात अधिकाऱ्यांच्या मंजूर असणाऱ्या संख्येच्या प्रमाणात बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध नाहीत. तसेच पावसाळ्यात कर्मचारी बसत असलेल्या संपूर्ण हॉलमध्ये सिलींग गळती असल्याने सर्वत्र संगणकावर व कर्मचारी बसत असलेल्या टेबल, फाईल्सवर पाणी पडते. त्यामुळे या ठिकाणाहून इतरत्र दुसऱ्या ठिकाणी कार्यालय तात्काळ हालविणेबाबत सविस्तर चर्चा झाली.<br>केंद्र शासनाकडील २०२१ मधील मार्गदर्शक सूचनांतील मुद्दा क्रमांक- २०.५ मधील "बी" नुसार वाहन व | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयासाठी सध्याची असलेली जागा ही सध्या कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना अपुरी पडत असून या कार्यालयात अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच या कार्यालयात अधिकाऱ्यांच्या मंजूर असणाऱ्या संख्येच्या प्रमाणात बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध नाहीत. सद्य:स्थिती पहाता कार्यालय इतरत्र ठिकाणी हालविणे आवश्यक असल्याने ते कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांची संख्या पहाता त्या प्रमाणात इतरत्र फर्निचरसह उपलब्ध असलेली जागा भाड्याने उपलब्ध करुन घेण्यास किंवा सदर जागेचे प्रत्यक्ष भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रमाणित करुन दिल्यानुसार हालविणेबाबत समितीने मान्यता दिली.<br>तसेच जर फर्निचरसह उपलब्ध जागा | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे. |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | कोणत्याही उपकरणाची खरेदी करण्यास आणि इमारतीचे बांधकाम करण्यास सक्त मनाई आहे. मात्र संगणक आणि उपकरणे आणि संबंधित आज्ञावली खरेदी करण्यास परवानगी आहे.<br>परंतू सद्य:स्थिती पहाता कार्यालय इतरत्र ठिकाणी हालविणे आवश्यक असल्याने ते कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांची संख्या पहाता त्या प्रमाणात इतरत्र फर्निचरसह उपलब्ध असलेली जागा भाड्याने उपलब्ध करुन घेण्यास किंवा सदर जागेचे प्रत्यक्ष भाडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी. प्रमाणित करुन दिल्यानुसार निकषानुसार देण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली.<br>तसेच जर फर्निचरसह उपलब्ध जागा मिळाली नाही तर अशावेळी इतरत्र अधिकारी व कर्मचारी यांच्या संख्येचा विचार करुन मोकळी जागा भाड्याने उपलब्ध करुन घेऊन त्यामध्ये तयार करावयाचे सर्व फर्निचर तयार करुन घेऊन सदरच्या जागेपोटी द्यावे लागणारे भाडे व फर्निचरपोटी होणारा एकूण खर्च करण्यास मान्यता मागण्यात आली व यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सल्ल्याने लागणारे भाडे प्रमाणित करुन घेण्यास व फर्निचरपोटी करावयाचा खर्च प्रचलित वित्तीय नियमास अनुसरुन करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | मिळाली नाही तर अशावेळी इतरत्र अधिकारी व कर्मचारी यांच्या संख्येचा विचार करुन मोकळी जागा भाड्याने उपलब्ध करुन घेऊन त्यामध्ये तयार करावयाचे सर्व फर्निचर तयार करुन घेऊन सदरच्या जागेपोटी द्यावे लागणारे भाडे व फर्निचरपोटी होणारा एकूण खर्च करण्यास समितीने मान्यता दिली.<br>यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सल्ल्याने लागणारे भाडे प्रमाणित करुन घेण्यास व फर्निचरपोटी करावयाचा खर्च प्रचलित वित्तीय नियमास अनुसरुन करण्याबाबत समितीने मान्यता दिली. | |
| ३. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत कार्यालयातील मंजूर असणाऱ्या आकृतीबंधानुसार नियमित शासकीय अधिकारी नियुक्तीबाबत तात्काळ कार्यवाही होणेबाबत. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत कार्यालयातील मंजूर असणाऱ्या आकृतीबंधानुसार नियमित शासकीय अधिकारी व कंत्राटी तत्वावरील प्रत्यक्ष मंजूर असणारी व प्रत्यक्ष कार्यरत असणाऱ्या पदांचे "परिशिष्ट-ब" वर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार या कार्यालयात मंजूर | या कार्यालयात मंजूर असणाऱ्या एकूण नियमित १४ शासकीय पदांपैकी रिक्त असणारी एकूण ९ पदे मंत्रालयीन स्तरावरुन तात्काळ भरणेबाबत समितीने मान्यता दिली. तसेच कार्यालयीन स्तरावर रिक्त असणारी कंत्राटी पदे ही | मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | असणाऱ्या एकूण नियमित १४ शासकीय पदांपैकी सध्या फक्त ५ पदे कार्यरत असून ९ पदे रिक्त आहेत. पैकी बहुतांशी पदे ही योजनेच्या सुरुवातीपासूनच रिक्त आहेत. तसेच प्रशासन अधिकारी यांचे पद हे १ वर्षापासून रिक्त आहे. त्याचा अतिरिक्त कार्यभार हा लेखा अधिकारी या पदाकडे दिल्यामुळे लेखा शाखेच्या कामकाजावरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर व योजनेच्या अंमलबजावणीवर याचा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे शासकीय रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कार्यवाही होणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. | आवश्यकतेनुसार कार्यालयीन स्तरावरुन सेवा पुरवठादार कंपनीकडून भरणेबाबत समितीने मान्यता दिली. | |
| ४ | सुधारित आकृतिबंधात बदल करणेबाबत. | | | |
| | १. MELD Expert या पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये अल्पसा बदल करणेबाबत. | १. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास MELD Expert चे १ कत्राटी पद मंजूर आहे. त्याची शैक्षणिक अर्हता Post Graduate Degree in Business Administration / Agriculture / Agriculture Economics / Statistics / Economics OR Graduate in Agriculture Engineering आणि १० वर्षाचा प्रकल्प व्यवस्थापनाचा (Project Management) चा अनुभव आवश्यक असून तो पाणलोट विकास यंत्रणा किंवा ग्राम विकास प्रकल्पाचा असणे अपेक्षित आहे. या शैक्षणिक अर्हतेमध्ये M.A., Sociology या Post Graduate Degree चा समावेश करणेबाबत चर्चा करण्यात आली. | १. MELD Expert च्या एका कत्राटी पदामधील शैक्षणिक अर्हतेमध्ये Post Graduate Degree मध्ये Business Administration / Agriculture / Agriculture Economics / Statistics / Economics OR Graduate in Agriculture Engineering या बरोबरच M.A., Sociology या Post Graduate Degree चा समावेश करणेबाबत समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| | २. वाहन चालकांच्या सध्या मंजूर असणाऱ्या पदांमध्ये ४ पदांची वाढ | २. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास वाहन चालकाचे १ कंत्राटी पद मंजूर | २. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास मंजूर असणाऱ्या वाहन | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | करणेबाबत. | असून माहे. जानेवारी. २०२५ पासून ते मृद व जलसंधारण आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. तसेच दिनांक- ०१/०३/२०२५ पासून वाहन चालकाचे १ कंत्राटी पद हे मंत्रालय, मुंबई येथे कार्यालयात घेण्यात आले आहे. त्यामुळे पूर्वीचे वाहन चालकाचे मंजूर असणारे १ कंत्राटी पद सोडून १ वाहन चालकास दिनांक- ०१/०३/२०२५ पासून कार्योत्तर व अतिरिक्त ३ पदांस मान्यता मिळणेबाबत चर्चा करण्यात आली. | चालकाच्या १ पदा व्यतिरिक्त १ पद दिनांक- ०१/०३/२०२५ पासून मंत्रालय, मुंबई येथे कार्यालयात घेण्यास समितीने मान्यता दिली. तसेच इतर अतिरिक्त ३ पदांस समितीने मान्यता दिली. | |
| | ३. शिपाई या पदाच्या मंजूर असणाऱ्या पदांमध्ये ४ पदांची वाढ करणेबाबत. | ३. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास शिपाई याची २ कंत्राटी पदे व सफाई कामगार याची २ कंत्राटी पदे मंजूर आहेत. कार्यालयातील अधिकाऱ्यांची संख्या व कामाचा व्याप पहाता सदरची संख्या कमी पडत आहे. तसेच आवश्यकतेनुसार ऐनवेळी कामकाजासाठी तात्काळ शिपाई याची कंत्राटी पदे तात्काळ उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने ४ अतिरिक्त कंत्राटी पदांस मान्यता मिळणेबाबत चर्चा करण्यात आली. | ३. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास सध्या मंजूर असणाऱ्या २ शिपाई व २ सफाई कामगार. या कंत्राटी पदाव्यतिरिक्त अतिरिक्त ४ शिपाई कंत्राटी पदे वाढ करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| | ४. मंत्रालय, मुंबई येथे मंजूर असणारे Database Analyst हे कंत्राटी पद वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास वर्ग करणेबाबत. | ४. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० या योजनेचे हे शेवटचे वर्ष आहे. त्यामुळे या कार्यालयास कामकाजाच्या दृष्टीने Database Analyst या अतिरिक्त एका पदाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मंत्रालय, मुंबई येथे मंजूर असणारे Database Analyst हे कंत्राटी पद वसुंधरा | ४. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास मंत्रालय, मुंबई येथे मंजूर असणारे Database Analyst हे कंत्राटी पद वर्ग करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयास वर्ग करणेबाबत चर्चा झाली. | | |
| | ५. तज्ञ सल्लागार नेमणेबाबत. (२ पदे) | ५. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजने अंतर्गत सहयोगी सल्लागार (Associate Consultant) नेमणेबाबत त्यांची कार्यकक्षा, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि मानधन याबाबत चर्चा करण्यात आली. | ५. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजंना पाणलोट विकास घटक २.० योजने अंतर्गत सहयोगी सल्लागार (Associate Consultant) हा माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-GAD-IT ०८०/ ४ /२०१४-O / O DIRECTORATE OF IT-DIT (MH), DTD. ०५/१०/२०२३ व GAD-IT ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), DTD. २७//१०/२०२३ १०/२०२३ मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून याबाबत नामनिर्देशित करण्यात आलेल्या संस्थाकडून ई-निविदा मागणी करण्यात येऊन सहयोगी सल्लागार (Associate Consultant) नेमणेबाबत कार्यवाही करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| | ६. प्रकल्पनिहाय १ कृषि तज्ञ व १ स्थापत्य अभियंता अशी २ पदांची वाढ करणेबाबत. | ६. प्रकल्पनिहाय १ कृषि तज्ञ व १ स्थापत्य अभियंता अशी प्रत्येकी २ पदांप्रमाणे २८० पदांची वाढ करणेबाबत चर्चा करण्यात आली. | ६. प्रकल्पनिहाय १ कृषि तज्ञ व १ स्थापत्य अभियंता अशी प्रत्येकी २ पदांप्रमाणे २८० पदांची वाढ करणेबाबत समितीने मान्यता दिली. तसेच यां पदांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता ही चालू कार्यरत असणाऱ्या पदांप्रमाणेच राहील. तसेच ही पदे ही चालू मनुष्यबळ सेवा पुरवठादार | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | यांचेमार्फतच आवश्यकतेनुसार भरण्याची कार्यवाही करणेबाबत समितीने मान्यता दिली. | |
| | ७. अतिरिक्त लेखा अधिकारी या १ पदाची वाढ करणेबाबत. | ७. वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाच्या अंतर्गत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजने करीता सद्य:स्थितीत अस्थापनेवर फक्त वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांचे प्रत्येकी १ पद मंजूर आहे. परंतु सद्य:स्थितीत लेखा अधिकारी यांच्याकडे प्रशासन अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याने लेखाविषयक बाबींची बहुतांशी कामे हे वित्त अधिकारी यांच्यामार्फत करावी लागत आहेत.<br>प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेअंतर्गत एकूण १ राज्यस्तर, ३० जिल्हास्तर, १४० प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा व ९६३ पाणलोट समिती सद्य:स्थितीत कार्यरत असून त्यांच्या स्तरावरून देयके अदा होत आहेत. सदर २.० योजनेस केंद्र शासन स्तरावरुन SNA-SPARSH प्रणाली लागू केली आहे. SNA-SPARSH प्रणाली मध्ये उपरोक्त सर्व स्तरावरील देयके ही राज्य स्तरावर मंजूरी साठी येणार आहे. हा कामाचा व्याप पाहता SNA SPARSH कडे योजना वर्ग झाल्यानंतर उपलब्ध असणाऱ्या २ पदांकडून कार्यालयीन कामकाज वेळेत पूर्ण होणे अतिशय अवघड आहे. त्यामुळे | ७. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या SNA-SPARSH प्रणाली साठी एक स्वतंत्र लेखा अधिकारी वर्ग-२ चे अतिरिक्त पद मंजूर करण्यास समितीने मान्यता दिली. | वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, चर्चगेट, मुंबई व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या SNA-SPARSH प्रणाली साठी एक स्वतंत्र लेखा अधिकारी वर्ग-२ चे अतिरिक्त पद मंजूर होणसाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. | | |
| ५ | सन २०२५-२६ चा वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी घेणे. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेचा सन २०२५-२६ चा वार्षिक कृती आराखडा "परिशिष्ट"क- मान्यतेस्तव सादर करण्यात आला. | सन २०२५-२६ च्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रंणा, पुणे |
| ६ | SNA SPARSH प्रणाली कार्यरत करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी निदर्शनास आणून देणेबाबत. | SNA SPARSH प्रणाली कार्यरत करणे बाबत खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली<br>केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.१(२७) PFMS/२०२०, दि २१.०५.२०२४ अन्वये SNA SPARSH Platform वर लागू करावयाच्या २७ योजनांची यादी दर्शविण्याल आली आहे. त्यामध्ये "प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना" या यंत्रणेचा समावेश आहे. केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) , राज्याची एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची ई-कुबेर प्रणाली (e-Kuber) यांच्या एकात्मिक रचनेच्या (Integrated Framework) माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी "SNA SPARSH" (समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण - Real time System of Integrated Quick Transfere) ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती नमुद करण्यात आलेली आहे. | SNA SPARSH प्रणाली तांत्रिक अडचणी बाबत शासन स्तरावरून केंद्र शासनास कळविण्याबाबत निर्णय झाला. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/ कोषा प्रशा-४, दि ११.१०.२०२४ अन्वये देण्यात आलेल्या सूचनेस अनुसरुन SNA SPARSH कार्यपध्दतीच्या अनुषंगाने प्रस्तूत कार्यालयाच्या मार्फत केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्रत्येक राज्य संलग्नित योजनेसाठी भारतीय रिझर्व बँकेमध्ये एक स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडण्याबाबत सुचित केलेले आहे त्यास अनुसरुन प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचे भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये आहरण खाते Drawing Account उघडण्यात आले आहे. तसेच Account आणि योजनेचे Mapping PFMS प्रणालीमध्ये करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाचे पत्र क्र. No. k-११०११/१३/ २०२२-WDC २.० Maharashtra (e-३०११९०८), दि २८.०१.२०२५ च्या पत्रान्वये रु ६०.८४ कोटीचे Mother Sanction देण्यात आलेले आहे.<br>दि. १३.०१.२०२५ च्या मा. सचिव भूसंसाधन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील आढावा बैठकीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी सद्य:स्थितीत नविन प्रणाली तात्काळ अवलंब सुरु केल्यास तांत्रिक अडचणीमुळे देयकांचे प्रदान होण्यास विलंब होऊ शकतो, त्याचा परिणाम योजनेच्या खर्चावर होऊन परिणामी पुढील निधी प्राप्त करुन घेण्यासाठी विलंब होऊ शकेल ही बाब केंद्राच्या निदर्शनास आणून दिली व एप्रिल, २०२५ पासून Onboard करण्याबाबत विनंती केली व त्यास केंद्राने संमती दिली व लवकरात लवकर SNA SPARSH Onboard करण्याबाबत केंद्राने सूचित केले.<br>त्या अनुषंगाने करावयाच्या तांत्रिक बाबीसंदर्भात चर्चा | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | करण्यासाठी प्रस्तूत कार्यालयातील वित्त अधिकारी यांनी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयातील उपसंचालक व मा. संचालक यांच्याशी प्रत्यक्ष दि. १३.०३.२०२५ केलेल्या चर्चेनुसार खालील बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.<br>१. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत कोषागारातून निधी आहरित करण्याकरीता पदनाम यांनी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर SNA SPARSH च्या अंमलबजावणीमध्ये आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांची भूमिका खूप महत्वाची आहे. योजनेंतर्गत अधिनस्त सर्व कार्यालयांकडून देयके तयार होऊन DDO यांचे मार्फत MTR-४४ BEAMS प्राधिकारपत्र तयार करुन राज्य शासनाकडील शासन निर्णय व प्राप्त देयके एकत्रित करुन सायबर कोषागारात प्रदानाकरीता अग्रेषित करावयाची आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत एकूण ११३८ कार्यालये (राज्यस्तर-१ जिल्हा ३०, तालुका-१४० व पाणलोट समिती ९६७) कार्यरत आहेत. सदर कार्यालयांकडून दैनंदिन प्राप्त होणा-या देयकांवर कार्यवाही करण्याकरीता बराच कालावधी लागणार आहे. सध्या कार्यरत आहरण व संवितरण अधिकारी यांना आयुक्त, मृद व जलसंधारण कार्यालयाकडील कामकाज सांभाळून आपल्या योजनेचे दैनदिन कामकाज नियमितपणे करणे शक्य होणार नाही. त्यामुळे विहित | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | कालावधीत देयकांचे प्रदान करणे शक्य होणार नाही. प्रस्तूत कार्यालय हे प्रकल्प म्हणून काम करीत असल्याने या कार्यालयास स्वतंत्र DDO घोषित करता येत नाही. ही बाब संचालक लेखा व कोषागारे यांच्या निदर्शनात आणून दिली आहे. तरी याबाबत त्यांचे स्तरावरुन Cyber Treasury अंतर्गत सध्या कार्यरत SNA Agency हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून Activate करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. जरी असे करण्यात आले तरी ११३८ कार्यालयांची दिवसभरात प्राप्त होणा-या देयकांवर राज्यस्तरीय कार्यालयाकडून एका व्यक्तीमार्फत करणे शक्य होणार नाही. तसेच मोठया प्रमाणावर देयके ही पाणलोट समिती स्तरावरुन सादर होणार आहेत, तरी या स्तरावर या सर्व तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी सक्षम कर्मचारी वर्ग उपलबध नाहीत.<br>२. तसेच SNAP Portal प्रणालीच्या माध्यमातून देयके प्रदानाकरीता सायबर कोषागारास सादर करावयाची असल्याने सदर प्रणालीवर योजनेअंतर्गत कार्यरत एकूण ११३५ कार्यालयांचे SNAP Portal प्रणालीवर Agency Declaration, Registration, Configuration, Authentication करणे तसेच e-हस्ताक्षर तयार करुन Mapping करणे या बाबीकरीता कालावधी लागेल. तसेच त्यासाठी प्रशिक्षणाची देखील आवश्यकता आहे. | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | सदर प्रशिक्षण संचालनालय व लेखा व कोषागारे यांचे मार्फत देण्यात येणार आहे.<br>३. मा. संचालक व उपसंचालक, लेखा व कोषागारे यांच्याशी SNA SPARSH Portal वर Onboard करण्याबाबत विचारणा केली असता सद्य:स्थितीत तांत्रिक अडचणीमुळे कोणतीही नवीन Scheme Onboard करणे शक्य नसल्याबाबत सांगण्यात आले. सर्वसाधारण परिस्थितीत SNA SPARSH प्रणालीवर सादर केलेल्या देयकांमध्ये कोणतीही त्रुटी नसल्यास देयक पारित होऊन प्रदान लाभार्थीपर्यत पोहचणे या प्रकीयेस सुमारे ८ ते १० दिवसाचा कालावधी लागत आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ माहे मार्च, २०२५ अखेर संपणार असल्याने SNA SPARSH प्रणालीवर Onboard केलेल्या योजनेकरीता शासन स्तरावरुन उपलब्ध झालेला निधी १००% खर्च होण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी त्यांची देयके दि. २०.०३.२०२५ पर्यत Cyber कोषागारात दाखल करण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे विहीत प्रशिक्षणानंतर माहे एप्रिल मध्ये SNA SPARSH बाबत कार्यवाही करणे योग्य राहील असे सांगण्यात आले. सद्य:स्थितीत SNA SPARSH प्रणालीमध्ये अनेक तांत्रिक अडचणीमुळे देयकांच्या प्रदानाकरीता १० ते १५ दिवसांचा कालावधी लागत आहे आणि सदर प्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबत कार्यवाही चालू आहे. सद्य:स्थितीत सदर योजनांचा कालावधी ३१ | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | मार्च, २०२६ रोजी संपत आहे. शेवटच्या वर्षामध्ये Consolidation व Exit बाबतची तयारी करावी लागणार आहे. सदर बाबींच्या साकल्याने विचार केल्यास याबाबतची वस्तुस्थिती केंद्र शासनास शासन स्तरावरुन सादर करणे आवश्यक आहे.<br>तथापि प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० SNA-SPARSH प्रणाली मध्ये समाविष्ट केल्यास सर्व स्तरावरील देयके ही राज्य स्तरावर मंजूरी साठी येणार आहे. हा कामाचा व्याप पाहता SNA SPARSH कडे योजना वर्ग झाल्यानंतर सद्य:स्थितीत कार्यरत असणाऱ्या २ पदांकडून कार्यालयीन कामकाज वेळेत पूर्ण होणे अतिशय अवघड आहे. त्यामुळे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या SNA-SPARSH प्रणाली साठी एक स्वतंत्र लेखा अधिकारी वर्ग-२ चे अतिरिक्त पद मंजूर होणेस चर्चा करण्यात आली. | | |
| ७ | GIS WORK STATION (२ नग) खरेदीस तांत्रिक विनिर्दिकेंना (Specifications) ना मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० योजने अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे कार्यालयात GIS CELL या कक्षामध्ये पाणलोटाचे, गाव नकाशे बनवणे आणि Geodatabase करणे इत्यादी कामे चालू आहेत. WORK STATION (संगणक) GIS CELL मध्ये घेण्याकरिता १२.१०.२०२२ च्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या (SLNA) बैठकीमध्ये क्षमता वाढ करून WORK STATION (संगणक) चे "परिशिष्ट-ड" नुसार Technical Specification प्रमाणे घेण्यास मंजुरी बाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. | MRSAC नागपूर यांच्याकडून अद्यावत Technical Specification घेऊन WORK STATION (संगणक) खरेदी करण्यास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे. |
| ८ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत कार्यरत | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० ही स्वायक्त | वसुंधरा पाणलोट |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | कार्यरत नियमित राजपत्रित अधिकाऱ्यांना विमान प्रवासाकरिता मंजुरी देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेबाबत. | नियमित राजपत्रित अधिकाऱ्यांना विमान प्रवासाकरिता मंजुरी देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | संस्था असल्याने कार्यरत नियमित राजपत्रित अधिकाऱ्यांना विमान प्रवासाकरिता मंजुरी देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले. | विकास यंत्रणा, पुणे |
| ९ | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात होणाऱ्या रक्कम रुपये- २५ लाखांपर्यंत सर्व प्रकारच्या महाटेंडरवर व जेम्स प्रणालीवर होणाऱ्या ई-निविदा साठी खरेदी समितीचे अध्यक्ष म्हणून अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणेबाबत. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात होणाऱ्या रक्कम रुपये- २५ लाखांपर्यंत सर्व प्रकारच्या महाटेंडरवर व जेम्स प्रणालीवर होणाऱ्या ई-निविदा साठी खरेदी. समितीचे अध्यक्ष म्हणून अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात होणाऱ्या रक्कम रुपये- २५ लाखांपर्यंत सर्व प्रकारच्या महाटेंडरवर व जेम्स प्रणालीवर होणाऱ्या ई-निविदा साठी खरेदी समितीचे अध्यक्ष म्हणून अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| १० | पाणलोट विकास पथक (WDT) मधील सदस्यांना कायम प्रवासभत्ता देणेस मान्यता मिळणेबाबत. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा WDT २.० अंतर्गत कंत्राटी पध्दतीने पाणलोट विकास पथक (WDT) यांची प्रकल्प कार्यान्ववीन यंत्रणा यांचे स्तरावर नियुक्ती करण्यात येते. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पाणलोट विकास पथक तांत्रिक पथक आहे. या पथकामार्फत पाणलोट समितीला प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन केले जाते. तसेच पाणलोट समिती स्थापन करण्यामध्ये व तिचे कार्य पार पाडण्यामध्ये सहाय्य करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी समन्वयक म्हणून काम करणे, अभियांत्रिकी दृष्टीने पर्यवेक्षण करणे, झालेल्या कामाची भौतिक तपासणी करणे, सनियंत्रण करणे, मूल्यांकन करणे व प्रत्यक्ष पडताळणी करणे, पाणलोट समिती संचिवांच्या मदतीने विविध प्रकारच्या नोंदवह्या व लेखे अद्यावत ठेवणे, प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या साधन संपत्तीचे प्रकल्प पश्चात जतन व देखभाल करणेसाठी | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे च्या अधिपत्याखाली तालुकास्तरावर पाणलोट विकास पथकामध्ये (WDT) कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय दि २९.०८.२००९ च्या धर्तीवर व वित्त विभाग शासन निर्णय दिनांक- ३/३/२०१० मधील "परिच्छेद १०" मधील नमूद प्रमाणे व राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या (SLNA) दिनांक- २८/१२/२०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र. १४ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या प्रवासभत्ता व दैनिकभत्त्याच्या "परिशिष्ट-ड" "तक्ता-अ" मधील अ.क्र.३ कॉलम ६ नुसार पाणलोट विकास पथक यांना प्रतिदिन दैनिक भत्ता रुपये- १००/- प्रमाणे १५ दिवसांच्या | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | उपभोक्तागट स्वयंसहाय्यता गट महिला यांना प्रशिक्षण देणे पायाभूत सर्वेक्षण व प्रशिक्षण यांचे आयोजन करणे व इतर अनुषंगिक कामकाज पाणलोट विकास पथक यांचे मार्फत केले जाते. याकरीता त्यांना सातत्याने दौरे करावे लागतात. सबब प्रवासभत्ते देयके वेळेवर तयार करणे शक्य होत नाही. त्यामुळे सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचेकडील शासन निर्णय दि २९.०८.२००९ च्या धर्तीवर व वित्त विभाग शासन निर्णय दिनांक- ३/३/२०१० मधील "परिच्छेद १०" मधील नमूद प्रमाणे पाणलोट विकास पथक यांना प्रतिदिन दैनिक भत्ता रुपये- १००/- प्रमाणे १५ दिवसांच्या मर्यादेत प्रतिमाह रुपये- १५००/- इतका कायम प्रवासभत्ता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.<br>१. संबंधीत पदधारकांनी त्यांना नेमून दिलेल्या फिरतीचे दिवसांइतकी फिरती प्रत्येक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.<br>२. केलेल्या फिरतीच्या दिवसांचा आढावा दर तीन महिन्यांनी घ्यावा. ज्या महिन्यात विहीत केलेल्या दिवसांपेक्षा कमी फिरती असेल त्या महिन्याचा भत्ता अनुज्ञेय होणार नाही. तथापि, काही आकस्मिक परिस्थितीत कर्मचा-याला नेमून दिलेल्या दिवसाच्या संख्येची पूर्तता करणे शक्य न झाल्यास व तशी कार्यालय प्रमुखांची खात्री झाल्यास ते अशा कर्मचा-यास त्या महिन्याच्या फिरती दिवसाच्या (कमाल १५ दिवसांच्या) संख्येच्या प्रमाणात कायम प्रवास मंजूर करु शकतील. | मर्यादेत प्रतिमाह रुपये- १५००/- इतका कायम प्रवासभत्ता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्याबाबत समितीने मान्यता दिली.<br>१. संबंधीत पदधारकांनी त्यांना नेमून दिलेल्या फिरतीचे दिवसांइतकी फिरती प्रत्येक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.<br>२. केलेल्या फिरतीच्या दिवसांचा आढावा दर तीन महिन्यांनी घ्यावा. ज्या महिन्यात विहीत केलेल्या दिवसांपेक्षा कमी फिरती असेल त्या महिन्याचा भत्ता अनुज्ञेय होणार नाही. तथापि, काही आकस्मिक परिस्थितीत कर्मचा-याला नेमून दिलेल्या दिवसाच्या संख्येची पूर्तता करणे शक्य न झाल्यास व तशी कार्यालय प्रमुखांची खात्री झाल्यास ते अशा कर्मचा-यास त्या महिन्याच्या फिरती दिवसाच्या (कमाल १५ दिवसांच्या) संख्येच्या प्रमाणात कायम प्रवास मंजूर करु शकतील.<br>३. कायम प्रवासभत्ता धारकांनी पुढील महिन्याचा नियोजित फिरती कार्यक्रम अगोदरच्या महिन्याच्या १० तारखे पर्यन्त कार्यालय प्रमुखास सादर करावा व त्याप्रमाणे फिरती करावी<br>४. उपरोक्त दैनंदिनी प्रत्येक महिन्याच्या ५ | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | ३. कायम प्रवासभत्ता धारकांनी पुढील महिन्याचा नियोजित फिरती कार्यक्रम अगोदरच्या महिन्याच्या १० तारखे पर्यन्त कार्यालय प्रमुखास सादर करावा व त्याप्रमाणे फिरती करावी<br>४. उपरोक्त दैनंदिनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस सादर करावी व त्या दैनंदिनीस कार्यालय प्रमुखांनी मान्यता दिल्याशिवाय पुढील महिन्याचा कायम प्रवासभत्ता अदा करु नये. | तारखेस सादर करावी व त्या दैनंदिनीस कार्यालय प्रमुखांनी मान्यता दिल्याशिवाय पुढील महिन्याचा कायम प्रवासभत्ता अदा करु नये. | |
| ११ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० (WDC-PMKSY २.०) अंतर्गत रु. १० कोटी मर्यादेत Flexi Fund तयार करणेस मान्यता मिळणेबाबत. | केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे भूसंसाधन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधील गुद्दा क्र. २०.४ नुसार एकूण प्रकल्प मूल्याच्या २५% रक्कम सर्व घटकातून काढून घेवून flexi-fund तयार करता येईल. यापूर्वी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे भूसंसाधन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधील ७.१.६ मध्ये capacity building या अंतर्गत नमूद केल्यानुसार National Bureau of Soil Survey & Land Use Planning (NBSS & LUP) यांच्या मदतीने LRI तयार करण्यासाठी Flexi fund तयार करून सदर निधी उपलब्ध करावा असा निर्णय दि २३.०२.२०२४ रोजी झालेल्या SLNA मध्ये झाला. त्यानुसार consolidation या घटकामधून रक्कम रु. ५ कोटी एवढ्या रकमेचा Flexi fund तयार करून त्यातून LRI तयार करण्यासाठी NBSS & LUP या संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या रक्कम रु. २.३९६८/- कोटी पैकी रक्कम रु. १.३९/- कोटी इतका निधी खर्च केलेला आहे. उर्वरीत बिलाची रक्कम रु. ०.९९८८/- कोटी खर्च होणे बाकी असुन एकुण रक्कम रु. २.३९६८/- कोटी खर्च होणे अपेक्षीत आहे. त्यानुसार Flexi fund रु. ५ कोटी पैकी रक्कम रु. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत यापूर्वी consolidation या घटकामधून रक्कम रु. ५ कोटी एवढ्या रकमेचा Flexi fund तयार करण्यात आला आहे. त्यातून LRI तयार करण्यासाठी NBSS & LUP या संस्थेस मंजूर करण्यात आलेल्या रक्कम रु. २.३९६८/- कोटी पैकी रक्कम रु. १.३९/- कोटी इतका निधी खर्च केलेला आहे. उर्वरीत बिलाची रक्कम रु. ०.९९८८/- कोटी खर्च होणे बाकी असुन एकुण रक्कम रु. २.३९६८/- कोटी खर्च होणे अपेक्षीत आहे. त्यानुसार Flexi fund रु. ५ कोटी पैकी रक्कम रु. २.६०३२/- कोटी शिल्लक राहतात.<br>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत येणाऱ्या विविध घटकांपैकी Monitoring and evaluation या घटकासाठी २% व consolidation या घटकासाठी ३% इतक्या निधीची तरतूद आहे. यास्तव Monitoring and evaluation या घटकातुन रक्कम रु. ३.७०/- कोटी व consolidation | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | २.६०३२/- कोटी शिल्लक राहतात.<br>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत येणाऱ्या विविध घटकांपैकी Monitoring and evaluation या घटकासाठी २% व consolidation या घटकासाठी ३% इतक्या निधीची तरतूद आहे. यास्तव Monitoring and evaluation या घटकातुन रक्कम रु. ३.७०/- कोटी व consolidation withdrawal phase या घटकातुन ३.७०/- कोटी असा एकुण रु. ७.४०/- कोटी इतका निधी काढून घेवून तसेच यापुर्वी तयार करण्यात आलेल्या flexi fund मधुन शिल्लक रक्कम रु. २.६०/- कोटी अशा एकुण रक्कम रु. १० /- कोटी flexi-fund तयार करुन पाणलोट जनभागीदारी कप उपक्रम, Cactus (काटे विरहीत निवडुंग लागवड) व इतर अनुषंगीक बाबींवर खर्च करण्यात येईल. यास्तव उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. १०.००/- कोटी flexi fund तयार करण्यासाठी बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | withdrawal phase या घटकातुन ३.७०/- कोटी असा एकुण रु. ७.४०/- कोटी इतका निधी काढून घेवून तसेच यापुर्वी तयार करण्यात आलेल्या flexi fund मधुन शिल्लक रक्कम रु. २.६०/- कोटी अशा एकुण रक्कम रु. १० /- कोटी flexi-fund तयार करुन पाणलोट जनभागीदारी कप उपक्रम, Cactus (काटे विरहीत निवडुंग लागवड) व इतर अनुषंगीक बाबींवर खर्च करण्यात येईल. यास्तव उपरोक्त प्रमाणे रक्कम रु. १०.००/- कोटी flexi fund तयार करण्यासाठी करण्यासाठी समितीने मान्यता दिली. | |
| १२ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत उत्पादन पद्धती घटकाच्या अंमलबजावणीसाठी पाणलोट समिती स्तरावर वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत मार्गदर्शक सूचनांना मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत उत्पादन पद्धती घटकाच्या अंमलबजावणीसाठी पाणलोट समिती स्तरावर वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत मार्गदर्शक सूचनांना मान्यता देणेबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत उत्पादन पद्धती हा घटक कृषी विभागांतर्गत कार्यरत आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार उत्पादन पद्धती या घटकासाठी रक्कम रु.६५ कोटी एवढा निधी आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आला आहे. परंतु खर्चाचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. तसेच सदर पुढील वर्ष हे योजना राबविण्याचे अंतिम वर्ष आहे. त्यामुळे १००% खर्च होण्याच्या दृष्टीने उत्पादन पद्धती घटकाच्या | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | अंमलबजावणीसाठी पाणलोट समिती स्तरावर वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत मार्गदर्शक सूचनांना दुरुस्तीसह मान्यता दिली. चर्चेअंती मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा यांनी आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे निर्देश दिले त्या पुढील प्रमाणे -<br>१. सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा.<br>२. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास यंत्रणा २.० च्या मार्गदर्शक सूचनांमधील उत्पादन पद्धती हा घटक राबविण्यासाठी जो निधी खर्च करण्याबाबत (प्रति हेक्टर नुसार) नमूद केले आहे. त्यास अनुसरून जास्तीत जास्त २ हेक्टर मर्यादेत लाभ देणेत यावा तसेच रक्कम रु. ५०,०००/- पर्यंत अनुदान देणेत यावे. यापेक्षा जास्त अनुदान देणेत येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.<br>३. बियाणे, गांडूळ खत हे जे घटक नमूद केले होते ते वगळण्यात यावेत. उत्पादन घटक राबविण्याच्या दृष्टीने व निधीचे खर्चाचे नियोजनाच्या दृष्टीने वसुंधरा कार्यालयाने आवश्यकतेनुसार वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात असे निर्देश समितीने दिले. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १३ | PMKSY-WDC- ३.० मार्गदर्शक सूचना व PPR तयार करणेसाठी क्षेत्रीय स्तरावर मार्गदर्शक सूचना देणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक ३.० करिता प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत केंद्रीय भूसंसाधन विभागाने सूचित केलेले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक ३.० करिता राज्यास केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी उपलब्ध होणेसाठी पाणलोट निवड करून प्राथमिक प्रकल्प अहवाल सादर करावयाचे आहेत. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक ३.० करिता पाणलोट निवड करणे व प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करणेची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना कळविणे बाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक ३.० करिता पाणलोट निवड करणे व प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करणेची जबाबदारी बाबत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांना कळविणे बाबत समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| १४ | प्र.मं.कृ.सिं.यो. - पा.वि.घ.२.० अंतर्गत १०० हे. क्षेत्रावर काटेविरहीत निवडुंग लागवड करणेसाठी Experession of Interest (EOI) वृत्तपत्रातून देणेस्तव EOI च्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० (PMKSY-WDC २.०) अंतर्गत १०० हे. क्षेत्रावर काटेविरहीत निवडुंग लागवड करणेसाठी Experession of Interest (EOI) वृत्तपत्रातून देणेस्तव EOI चा मसुदा समितीसमोर मांडण्यात आला त्याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात आली त्यानंतर EOI च्या मसुद्यास मान्यता देण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. (परिशिष्ट - ई) | ICE (Information, Education, Communication) यासाठी आणि शेतकऱ्यांना लागवड साहित्य पुरवण्यासाठी जो खर्च येईल तेवढा निधी EOI मधून पात्र ठरणाऱ्या संस्थेस प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० (PMKSY-WDC २.०) मधून देणेत येईल. या दुरुस्तीनुसार Experession of Interest (EOI) च्या मसुद्यात बदल करुन मसुद्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व वाल्मी |
| १५ | प्र.मं.कृ.सिं.यो. - पा.वि.घ.२.० अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे यांचेकडून प्रकल्प क्षेत्रात काटेविरहीत निवडुंग लागवड करणेसाठी TISSUE CULTURE च्या माध्यमातून रोपे तयार करणेस्तव, TISSUE CULTURE LAB अद्यावत | प्र.मं.कृ.सिं.यो. - पा.वि.घ. २.० अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे यांचेकडून प्रकल्प क्षेत्रात काटेविरहीत निवडुंग लागवड करणेसाठी TISSUE CULTURE च्या माध्यमातून रोपे तयार करणेस्तव, TISSUE CULTURE LAB अद्यावत करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा | प्र.मं.कृ.सिं.यो. - पा.वि.घ. २.० अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे यांचेकडून प्रकल्प क्षेत्रात काटेविरहीत निवडुंग लागवड करणेसाठी TISSUE CULTURE च्या माध्यमातून रोपे तयार करणेस्तव, TISSUE CULTURE LAB अद्यावत | कृषि महाविद्यालय, पुणे व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | करणेस्तव, TISSUE CULTURE LAB अद्यावत करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत. | निधी उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. (परिशिष्ट – फ) | करणेस्तव, TISSUE CULTURE LAB अद्यावत करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेच्या प्रस्तावास बैठकीमध्ये समितीकडून मान्यता देण्यात आली. | |
| १६ | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) बैठकीत मान्यता मिळालेल्या भंडारा जिल्ह्यातील प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) मान्यता मिळणेबाबत. | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प क्षेत्र कमीत कमी २५०० हे. असणे आवश्यक आहे. परंतु भंडारा जिल्ह्यातील २ प्रकल्पाचे क्षेत्र २५०० हे. पेक्षा कमी आहे. सदरच्या २ प्रकल्पांना दि. ०१/१०/२०२४ रोजीच्या केंद्र शासनाच्या सुकाणू समिती (Steering Committee) कडून मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार दि. ०५/०३/२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) ११ व्या बैठकीत २ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) तांत्रिक मान्यता देण्यात आली असून SLNA मंजुरी बाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. | भंडारा जिल्ह्यातील २ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे. जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र, भंडारा. |
| १७ | MELD - प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या मूल्यमापनासाठी महाराष्ट्र राज्य सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता संस्था (MS-SSAT) यांचे मार्फत करून घेणेस मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या मूल्यमापणासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीच्या सामाजिक अंकेक्षण (Social Audit) च्या कामाकरिता महाराष्ट्र शासनाने, ग्रामपंचायतीमधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) घेतलेल्या कामांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी ग्रामसभा/वार्डसभांना मदत करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता संस्था (MS-SSAT) नावाचे एक स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण युनिट (SAU) स्थापन केले आहे. त्याप्रमाणे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या मूल्यमापणाचे काम महाराष्ट्र राज्य सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या मूल्यमापणासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीच्या सामाजिक अंकेक्षण (Social Audit) च्या कामाकरिता महाराष्ट्र शासनाने, ग्रामपंचायतीमधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) घेतलेल्या कामांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी ग्रामसभा / वार्डसभांना मदत करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता संस्था (MS-SSAT) नावाचे एक स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण युनिट (SAU) स्थापन केले आहे. त्याप्रमाणे प्रधानमंत्री | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | संस्था (MS-SSAT) या संस्थेस देणे बाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या मूल्यमापणाचे काम महाराष्ट्र राज्य सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता संस्था (MS-SSAT) या संस्थेस देणे बाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर सदर मुल्यमापनासाठी यशदा, पुणे ही सुध्दा संस्था कार्यरत आहे. त्यामुळे मुल्यमापनासाठी MS-SSAT किंवा यशदा, पुणे या दोन संस्थेपैकी मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी संबंधितांबरोबर चर्चा करुन कोणतीही एक संस्था नेमण्यास मान्यतां प्रदान करण्यात आली. | |
| १८ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० (WDC-PMKSY २.०) अंतर्गत "पाणलोट जनभागीदारी कप" हा उपक्रम आयोजित करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वाल्मी संस्थेस क्षमता बांधणी घटकांतर्गत वर्ग करण्यात आलेल्या निधीतून खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० (PMKSY - WDC २.०) अंतर्गत "पाणलोट जनभागीदारी कप" हा उपक्रम आयोजित करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वाल्मी संस्थेस क्षमता बांधणी घटकांतर्गत वर्ग करण्यात आलेल्या निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० (PMKSY - WDC २.०) अंतर्गत "पाणलोट जनभागीदारी कप" हा उपक्रम आयोजित करण्यासाठी दि. १२/०३/२०२५ रोजीचे प्राप्त पत्र क्र. K-११०११/२१/२०२४-WDCPMKSY या केंद्र शासन परिपत्रकानुसार होणाऱ्या खर्चास वाल्मी संस्थेस क्षमता बांधणी घटकांतर्गत वर्ग करण्यात आलेल्या निधीतून खर्च करण्यास बैठकीमध्ये समितीकडून मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १९ | PIA LIST अवलोकनार्थ. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० (PMKSY - WDC २.०) अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) ची यादी समितीस अवलोकनार्थ सादर करण्यात आली. अद्यावत ४ NGOs सहित यादी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली. एकूण १४० PIA ची यादी समितीसमोर मांडण्यात आली.<br>(परिशिष्ट -द) | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) च्या यादीस समितीकडून मान्यता देण्यात आली. यात प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून ४ स्वयंसेवी संस्थाची निवड पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांचेद्वारे करण्यात आली आहे.<br>१. मंद्राई संस्था, धुळे (प्रकल्प क्र. २, जि. नाशिक)<br>२.निलकंठेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी (प्रकल्प क्र. २, जि. धाराशिव)<br>३.लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर (प्रकल्प क्र.३, जि. धाराशिव)<br>४. निलकंठेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी (प्रकल्प क्र. १, जि. परभणी)<br>अशा एकूण १४० प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) च्या यादीस बैठकीमध्ये समितीकडून मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| २० | ऐनवेळचे विषय | | | |
| | १. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रेरक उपक्रम या घटकाच्या अंमलबजावणीबाबत. | १. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती हे घटक कृषी विभागांतर्गत कार्यरत आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्रवेश प्रेरक उपक्रम या घटकासाठी रक्कम रु. २६.७१ कोटी व उत्पादन पद्धती या | १. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती हे घटक कृषी विभागांतर्गत कार्यरत आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार प्रवेश प्रेरक उपक्रम या | आत्मा यंत्रणा व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | | बैठकीतील चर्चा | | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | घटकासाठी रक्कम रु.६५ कोटी एवढा निधी आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आला आहे.<br>परंतु प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत योजनेच्या प्राथमिक प्रकल्प अ हवालानुसार एकूण प्रकल्प मुल्य रक्कम रु. १३३५.५६ कोटी एवढे होते. त्यानुसार मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेनुसार २ टक्केच्या मर्यादेत एकूण रक्कम रु. २६.७१ कोटी एवढ्या रकमेची तरतूद करणे अपेक्षित असल्याने सदर रक्कम दि. २५/०१/२०२३ रोजीच्या निधी वितरण आदेशान्वये आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आली आहे. परंतु त्यानंतर अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आले त्यानुसार एकूण मुल्य कमी झाले असून रक्कम रु. १२५१.१४ कोटी झाले असून त्यानुसार मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार ही रक्कम रु. २५.०२ कोटी एवढी येत असून प्रवेश प्रेरक उपक्रम घटकाच्या उर्वरित शिल्लक निधी उत्पादन पद्धती या घटकावर खर्च करण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. | | घटकासाठी रक्कम रु. २६.७१ कोटी व उत्पादन पद्धती या घटकासाठी रक्कम रु.६५ कोटी एवढा निधी आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आला आहे. हे दोन्ही घटक आत्मा यंत्रणेमार्फतच राबविण्यात येत असल्यामुळे प्रवेश प्रेरक उपक्रम या घटकाचा मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार उर्वरित शिल्लक निधी हा उत्पादन पद्धती (Production System) या घटकावर वर्ग करून त्यानुसार खर्च करण्यास बैठकीमध्ये समितीने मान्यता दिली. | |
| २. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत खालील नमूद केल्याप्रमाणे घटकनिहाय वितरीत निधीच्या व्याजाच्या खर्चाच्या अंमलबजावणी बाबत.<br>**a)** प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती | २. | प्रधनमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती हा घटक कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्र. a)** मध्ये नमूद केल्यानुसार प्रवेश प्रेरक | २. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादंन पद्धती हा घटक कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्र. a)** मध्ये नमूद केल्यानुसार प्रवेश | आत्मा यंत्रणा, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | या घटकांचा निधी कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात आलेला आहे.<br>b) क्षमता बांधणी घटकाअंतर्गत प्रशिक्षणासाठी जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर संस्थेस निधी वितरीत करण्यात आलेला आहे.<br>c) फळबाग लागवडीकरीता कलमे रोपे पुरवठा करण्यासाठी संचालक फलोत्पादन तथा राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, पुणे यांना रक्कम रु. ७ कोटी एवढा निधी वर्ग करण्यात आलेला आहे.<br>d) DRO, PTO व LRA संस्थांचे प्राप्त प्रस्तावांचे फेरतपासणी व पुर्नमुल्यांकन यशदा संस्थेमार्फत करणेबाबत. | उपक्रम हा घटक राबविण्यासाठी दि. २५/०१/२०२३ रोजीच्या निधी वितरण आदेशान्वये रक्कम रु. २६.७१ कोटी व उत्पादन पद्धती या घटकासाठी दि. २४/११/२०२३ रोजीच्या आदेशान्वये रक्कम रु. ४० कोटी व दि. २८/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये रक्कम रु. २५ कोटी अशी एकूण ६५ कोटी एवढी रक्कम जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.<br>**मुद्दा क्र. b)** मध्ये नमूद केल्यानुसार क्षमता बांधणी घटकाअंतर्गत प्रशिक्षणासाठी जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर यांना एकूण रक्कम रु. ३२ कोटी निधी वर्ग करण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्र. c)** मध्ये नमूद केल्यानुसार फळबाग लागवडीकरीता कलमे रोपे पुरवठा करण्यासाठी संचालक फलोत्पादन तथा राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, पुणे यांना रक्कम रु. ७ कोटी अदा करणे बाबत मा. प्रधान सचिव मृद व जलसंधारण यांच्या अध्यक्षतेखालील दि. २३/०१/२०२३ च्या बैठकीत व राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २७/०१/२०२३ रोजीच्या चौथी बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दि. ३०/०१/२०२३ रोजीच्या निधी वितरण आदेशानुसार रक्कम रु.७ कोटी वर्ग करण्यात आलेले आहेत. या रकमेवर जे व्याज (ज्या ज्या वेळी खर्च झाला तो खर्च वजा जाता शिल्लक रकमेवर) | प्रेरक उपक्रम हा घटक राबविण्यासाठी रक्कम रु. २६.७१ कोटी व उत्पादन पद्धती या घटकासाठी एकूण रक्कम रु. ६५ कोटी आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आलेले आहेत.<br>**मुद्दा क्र. b)** मध्ये नमूद केल्यानुसार क्षमता बांधणी घटकाअंतर्गत प्रशिक्षणासाठी जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छत्रपती संभाजीनगर या संस्थेस रक्कम रु. ३२ कोटी निधी वर्ग करण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्र. c)** मध्ये नमूद केल्यानुसार फळबाग लागवडीकरीता कलमे रोपे पुरवठा करण्यासाठी संचालक फलोत्पादन तथा राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, पुणे यांना रक्कम रु. ७ कोटी वर्ग करण्यात आलेले आहेत. या रकमेवर जे व्याज (ज्या ज्या वेळी खर्च झाला तो खर्च वजा जाता शिल्लक रकमेवर) जमा झाले आहे.<br>**मुद्दा क्र. d)** मध्ये नमूद केल्यानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या क्षमता बांधणी घटकाअंतर्गत DRO, PTO व LRA संस्थांचे प्रस्तावांची छाननी यशदा संस्थेमार्फत करणेकरिता येणाऱ्या खर्चासाठी क्षमता बांधणी घटकांतर्गत वाल्मी संस्थेस वितरीत करण्यात आलेल्या ३२ कोटी निधीच्या | |

| अ. क्र. | विषय | | बैठकीतील चर्चा | | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जमा झाले आहे.<br>**मुद्दा क्र. d)** मध्ये नमूद केल्यानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या क्षमता बांधणी घटकाअंतर्गत DRO, PTO व LRA संस्थांचे मा. मंत्री, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली निवड न झालेल्या संस्थांच्या तक्रारींची चौकशी करुन इतर पात्र संस्थांना काम करण्याची संधी उपलब्ध करुन देणेबाबत दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांचे फेरतपासणी व पुर्नमुल्यांकन करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सदर बैठकीत यशदा संस्थेमार्फत संस्थांच्या फेरतपासणी व पुर्नमुल्यांकन करणेबाबत चर्चा करण्यात आली.<br>उपरोक्तप्रमाणे **मुद्दा क्र. a, b, c व d** मध्ये नमूद केल्याप्रमाणे या सर्व घटकांवर वितरीत निधीच्या व्याजाची रक्कम खर्च करावयाच्या नियोजनाबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. | | व्याजाच्या रक्कमेतून खर्च करण्यास समितीने निर्देश दिले.<br>त्यानुसार उपरोक्तप्रमाणे **मुद्दा क्र. a, b, c व d** मध्ये नमूद केल्याप्रमाणे या सर्व घटकांवरील वितरीत निधीच्या अनुषंगाने जमा झालेल्या व्याजाची रक्कम ही ज्या घटकाअंतर्गत निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्या घटकाअंतर्गतच खर्च करण्यात यावी असे निर्देश समितीने दिले. | |
| ३. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात मंजूर असणारे लघुलेखक (Stenographer) हे १ कंत्राटी पद भरणेबाबत. | ३. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात मंजूर असणारे लघुलेखक (Stenographer) हे १ कंत्राटी पद भरणेबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये सद्य:परिस्थीतीत कार्यालयामध्ये लघुलेखक | ३. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयात मंजूर असणारे लघुलेखक (Stenographer) या १ पदाऐवजी १ कंत्राटी लिपिकाचे पद भरण्यास समितीने | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | (Stenographer) या पदाची जास्त आवश्यकता भासत नाही. त्यामुळे त्याऐवजी एका लिपिकाची किंवा डाटा एंन्ट्री ऑपरेटरची या एका पदाची नियुक्ती करुन त्याकडून आवश्यक ती कामे करुन घेणेबाबत चर्चा करण्यात आली. | मान्यता दिली. | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(प्रकाश खपले) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

(गणेश पाटील)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
सचिव, मृद व जल संधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई